महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेवरील सूचना व हरकतींची सुनावणी पूर्ण

e Paper



दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 11/09/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 215 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# कुशल मनुष्यबळ पुरवण्यात महाराष्ट्र अग्रेसर - मुख्यमंत्री

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : परदेशातील उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेवून त्यानुसार अभ्यासक्रमांचा प्रशिक्षणात समावेश करावा. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाबरोबरच खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठीही एक सक्षम यंत्रणा तयार करण्यात यावी. आयटीआयमार्फत राबविण्यात येणारे अल्पकालीन अभ्यासक्रम अधिक प्रभावीपणे राबवा. प्रशासनमार्फत केलेल्या सर्व सामंजस्य करारांचा आढावा सीएम डॅशबोर्डवर घेण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**



सह्याद्री अतिथीगृह येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी, आयुक्त लहूराज माळी, व्यवसाय व शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, परदेशात आज कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे हे लक्षात घेवून या विभागाने काळानुरूप आवश्यक असे अभ्यासक्रम सुरू करावेत. रोजगार वाढीसाठी करण्यात आलेल्या सामंजस्य कराराची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम यंत्रणा तयार करावी. एखाद्या व्यक्तीने कौशल्य अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापासून ते अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंतची सर्व माहिती डिजिटली पद्धतीने तपासली जावी. शासकीय आयटीआय जागतिक दर्जाच्या कौशल्य केंद्रात रूपांतरीत करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्या. 'मित्रा'संस्थेकडूनही मार्गदर्शन घेण्यात यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना तसेच उपक्रमांची माहिती दिली. आयटीआयमध्ये सौर तंत्रज्ञ, इलेक्ट्रिक वाहन मेकॅनिक, ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग (3D प्रिंटिंग), ड्रोन तंत्रज्ञ, औद्योगिक रोबोटिक्स, एआय प्रोग्रामिंग असिस्टंट असे अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील.

शहरी, ग्रामीण व आदिवासी भागासाठी त्यांच्या गरजावर आधारित अभ्यासक्रम तयार करण्यात येतील असेही लोढा यांनी यावेळी सांगितले.

यावेळी महिंद्रा अँण्ड महिंद्रा कंपनीसोबत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने विविध प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार केला.

महिन्द्रा अँण्ड महिन्द्रा लिमीटेडचे प्रमुख प्रफुल्ल पांडे आणि महिंद्रा अँण्ड महिंद्रा शिक्षण विभागाचे प्रमुख डॉ. लेविस यावेळी उपस्थित होते.

# नेपाळमध्ये अडकलेल्या पर्यटकांना सुखरुप आणण्यास प्राधान्य

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : नेपाळमधील राजकीय अस्थिरता आणि त्यामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तिथे अडकलेल्या महाराष्ट्रातील पर्यटकांना सुखरुप परत आणण्यासाठी राज्य सरकार युध्द पातळीवर प्रयत्न करत आहे.**



उपमुख्यमंत्री अजित पवार

केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालय तसेच महाराष्ट्र सदन यांच्या माध्यमातून राज्य शासन नेपाळमधील भारतीय दूतावासाच्या संपर्कात असून राज्यातील पर्यटकांना आवश्यक ती मदत पुरविण्याचे प्रयत्न करत आहे. नेपाळमध्ये अडकलेल्या

प्रत्येक पर्यटकाला सुरक्षितपणे घरी परत आणणे आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणे हीच प्राथमिकता आहे.

त्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटकांनी घाबरुन जाऊ नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.राज्यातील ठाणे, पुणे, मुंबई, लातूर, कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे १०० पर्यटक नेपाळमध्ये अडकले असल्याची माहिती आतापर्यंत प्राप्त झाली आहे. त्याव्यतिरिक्त बीड जिल्ह्यातून गेलेले पर्यटक रस्ता मार्गे खासगी वाहनाने परत येण्यासाठी निघालेले असून ते उत्तर प्रदेशात गोरखपूरपर्यंत पोहचले आहेत.

सर्वाधिक पर्यटक ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथील आहेत. अडकलेल्या पर्यटकांना आवश्यक ती मदत करण्यासाठी राज्य शासन तत्पर असून त्यांच्याशी संपर्क साधून आहे. सर्व पर्यटक सुरक्षित आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

# बटरफ्लाय पूल ठरतोय आकर्षणाचा केंद्रबिंदू!

## उच्च दर्जाचे एलईडी तंत्रज्ञान वापरत करण्यात आली विद्युत रोषणाई

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी: रंगीबेरंगी झगमगाटाने उजळलेला पूल... विविध रंगांच्या छटा निर्माण करणारी रोषणाई... असा वेगळाच अनुभव थेरगाव ते चिंचवड दरम्यानच्या बटरफ्लाय पुलावरून प्रवास करताना नागरिकांना येत आहे. पवना नदीवर उभारलेला हा पूल आता रोषणाईच्या झळाळीने अधिकच खुलून दिसत असून, रात्रीच्या वेळी पुलावर साकार होणारा हा रंगोत्सव नागरिकांना आकर्षित करत आहे.



पिंपरी चिंचवड महापालिकेकडून शहरात आधुनिक पायाभूत सुविधा उभारण्याबरोबरच शहरात सौंदर्यपूर्ण वास्तू उभारण्यावर भर दिला जात आहे. थेरगाव येथे पवना नदीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेला बटरफ्लाय पूल हा त्याचाच एक भाग आहे. हा पूल आता शहराचे एक नवे आकर्षण ठरत आहे. पुलाचे अनोखे डिझाइन हे शहराच्या सौंदर्यात भर घालणारे असून, आता महापालिकेच्या विद्युत विभागाच्या वतीने पुलावर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई त्याच्या देखणेपणात अधिकच भर घालत आहे.या रोषणाईसाठी उच्च दर्जाचे एलईडी लिनिअर वॉश लाईट्स (I P 6 5 ) बसवण्यात आले आहेत. या लाईट्सना ५१२ डीएमएक्स पॉवरसह आरजीबी तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असून, त्यामुळे पुलावरील रोषणाई विविध रंगांच्या छटा निर्माण करत प्रत्येक क्षणी वेगळेच दृश्य साकारते. रात्रीच्या वेळी पुलावरून जाणाऱ्या वाहनचालकांसाठी तसेच परिसरातील नागरिकांसाठी हा अनुभव नेत्रसुखद ठरत आहे. येथील आकर्षक रोषणाईची अनेकजण छायाचित्रे व व्हिडिओ घेत आहेत.

त्यामुळे हा पूल फक्त वाहतुकीपुरता मर्यादित न राहता नागरिकांसाठी आणि पर्यटकांसाठी एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ ठरत आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नयनरम्य विद्युत रोषणाईथेरगाव येथील बटरफ्लाय पुलाप्रमाणेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चिंचवड येथील मदर तेरेसा उड्डाणपूल, नाशिक फाटा येथील जे. आर. डी. टाटा उड्डाणपूल यांना नयनरम्य विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

तसेच भक्तीशक्ती येथील उड्डाणपुलावरील विद्युत रोषणाईचे काम प्रगतीपथावर आहे.

या विद्युत रोषणाईसाठी एलईडी दिव्यांचा वापर केल्यामुळे कमी विजेमध्ये आकर्षक रोषणाई होत आहे.

# आरोग्य निरीक्षकांसाठी दहा दिवसीय पायाभूत प्रशिक्षणाला सुरुवात

## घनकचरा व्यवस्थापन, प्रथमोपचार, नागरिक सेवा यांसह विविध विषयांवर मार्गदर्शन

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागातील नवनियुक्त आरोग्य निरीक्षकांसाठी दहा दिवसीय पायाभूत प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट व वेस्ट मॅनेजमेंट अँड रिसर्च सेंटर यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा पिंपरी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात होत आहे.महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेचे उद्घाटन उपायुक्त सचिन पवार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी



अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे विभागीय संचालक द. गा. मोरे, स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रम प्रमुख डॉ. हरिश रसानकर यांच्यासह महापालिकेच्या सर्व ८ क्षेत्रीय कार्यालयांतील आरोग्य निरीक्षक उपस्थित होते.उपायुक्त सचिन पवार यावेळी म्हणाले की,'प्रत्येक आरोग्य निरीक्षकाला घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, प्रथमोपचार, माहितीचा अधिकार, महाराष्ट्र नागरिक सेवा तसेच कायदेविषयक बाबींचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे. या सर्व विषयांची उजळणी करून काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. या दृष्टीने पायाभूत प्रशिक्षण हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरतो.'आरोग्य निरीक्षकांची भूमिका स्पष्ट करताना द.गा. मोरे यांनी सांगितले की, 'आरोग्य निरीक्षक हा प्रशासन व नागरिकांमधील महत्त्वाचा दुवा असून समाजाचा कणा आहे. नागरिकांच्या समस्या सोडवून सक्षम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची आहे.

'यावेळी डॉ. हरिश रसानकर यांनी आरोग्यविषयक सेवा, आरोग्य संवर्धन, उपचार पद्धती यासंबंधी सविस्तर मार्गदर्शन केले.

अशा प्रशिक्षण उपक्रमांच्या माध्यमातून आरोग्य निरीक्षकांच्या कार्यकुशलतेत वाढ होऊन नागरिकांना अधिक सक्षम आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, असे मतही या कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रशिक्षकांनी व्यक्त केले. तसेच दहा दिवसीय प्रशिक्षणामध्ये कोणकोणत्या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे, याबाबतही सविस्तर माहिती देण्यात आली

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 11/09/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महापालिकेच्या शाळांची जिल्हास्तरीय रिंग टेनिस स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांनी जिल्हास्तरीय (रिंग टेनिस) स्पर्धा – १४ वर्षे मुलांचा गट मध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या स्पर्धेत पिंपरी चिंचवड विभागातील ४४ शाळांचे संघ सहभागी झाले होते. त्यामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चार शाळांनी टॉप ८ मध्ये स्थान मिळवले आहे. तसेच छत्रपती शाहूजी महाराज इंग्रजी माध्यम शाळा, कासारवाडी या शाळेची विद्यार्थिनी अविन्या साबळे हिने जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धा (वय वर्ष १७ मध्ये ४५ किलो वजन गट - मुली) मध्ये रौप्य पदक पटकावले.स्पर्धेच्यानिकालानुसार, कै.दत्तोबा रामचंद्र काळे इंग्रजी




माध्यम शाळा, काळेवाडी ही शाळा प्रथम क्रमांकावर राहिली व सुवर्ण पदकाची मानकरी ठरली. तसेच विभागीय स्तरावरील पुढील स्पर्धेसाठी पात्र ठरली. सावित्रीबाई फुले इंग्रजी माध्यम शाळा, मोशी ही शाळा तिसऱ्या क्रमांकावर राहिली. तर श्रीमती अनुसयाबाई नामदेव वाघेरे इंग्रजी माध्यम शाळा, पिंपरी ही शाळा चौथ्या क्रमांकावर तसेच छत्रपती शाहूजी महाराज इंग्रजी माध्यम शाळा, कासारवाडी ही शाळा सातव्या क्रमांकावर राहिली.दरम्यान, शाळांमध्ये क्रीडा हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वाचा घटक आहे. संघभावना, सामंजस्य, नेतृत्व, चिकाटी आणि धैर्य या गुणांचा विकास विद्यार्थ्यांमध्ये होण्यासाठी क्रीडा स्पर्धा अत्यंत आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये अशा स्पर्धांचे आयोजन नियमितपणे केले जाते, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा फक्त शैक्षणिक विकास होत नाही तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासही साधला जातो, अशी माहिती शिक्षण विभागातून देण्यात आली.स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे आहेत :• कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्रजी माध्यम शाळा, काळेवाडी – १ ला क्रमांक (सुवर्ण पदक, विभागीय स्तरासाठी पात्र)• सावित्रीबाई फुले इंग्रजी माध्यम शाळा, मोशी – ३ रा क्रमांक• श्रीमती अनुसयाबाई नामदेव वाघेरे इंग्रजी माध्यम शाळा, पिंपरी – ४ था क्रमांक• छत्रपती शाहूजी महाराज इंग्रजी माध्यम शाळा, कासारवाडी – ७ वा क्रमांक

# मुंबई-बंगळुरु महामार्गावर 26 लाखांचा गुटखा जप्त !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई – बंगळुरू महामार्गावर अन्न आणि औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. अवैधरित्या २६ लाखांचा गुटखा घेऊन जाणाऱ्या ट्रकला पकडलं आहे. महाराष्ट्रात गुटखा बंदी आहे.

तरी देखील अशा छुप्या पद्धतीने गुटखा विकला जात




असल्याच निदर्शनास आलं आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई- बंगळुरू महामार्गावरून अवैधरित्या गुटखा घेऊन जाणार असल्याची गुप्त माहिती अन्न आणि औषध प्रशासनाच्या पथकाला मिळाली होती.

संशयित ट्रक थांबवून झडती घेण्यात आली. ट्रकमध्ये विविध कंपनीचा गुटखा आढळला असून त्याची किंमत तब्बल २६ लाख रुपये आहे.

हा गुटखा कर्नाटकहून मुंबईकडे जात होता. महाराष्ट्रात गुटखा बंदी आहे.

त्यामुळं छुप्या पद्धतीने गुटखा घेऊन जाण्यात येत होता.ही मोठी कारवाई मानली जात आहे.

# शहरात जिल्हास्तर व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने आणि ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय निगडी यांच्या सहकार्याने दिनांक ९/९/२०२५ रोजी जिल्हास्तर १७ वर्षे मुलांच्या शालेय स्पर्धेने व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन मा. क्रीडा उपायुक्त श्री पंकज पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाले

.या प्रसंगी ज्ञानप्रबोधिनीचे विद्यालयाचे प्राचार्य बाळकृष्ण



धुमाळ,केंद्रप्रमुख श्री मनोज देवळेकर, क्रीडा पर्यवेक्षक श्री बन्सी आटवे , सुभाष जावीर, वाल्मिकी पवार व इतर मान्यवर उपस्थित होते दिनांक ९/९/२०२५ ते १२/९/२०२५दरम्यान संपन्न होणाऱ्या या स्पर्धेमध्ये खाजगी आणि मनपा अशा एकूण २९० विद्यालयांनी भाग घेतला असून एकूण ३५०४ विद्यार्थी या स्पर्धेमध्ये सहभागी होत आहेत.

सदर स्पर्धेचे कामकाज विशाल होले, शिंदे, सुरेश मंजाळ, हरिभाऊ गायकवाड, विठ्ठल पारखे, धनंजय झिंजुर्डे, खेमराज ठकुरानी, गणेश भोसले पाहिले.

स्पर्धेचा निकाल -ज्ञान प्रबोधिनी विद्यालय निगडी प्रथम क्रमांकश्री वाघेश्वर विद्यालय चऱ्होली द्वितीय क्रमांकरामचंद्र गायकवाड विद्यालय दिघी तृतीय क्रमांक

# महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेवरील सूचना व हरकतींची सुनावणी पूर्ण

## शहरातील ३२ प्रभागांसाठी प्राप्त हरकतींवर झाली सुनावणी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकती व सूचनांची सुनावणी आज चिंचवड येथील ॲटो क्लस्टर सभागृहात पार पडली. सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव तथा प्राधिकृत अधिकारी प्रविण दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सुनावणी प्रक्रिया पार पडली.**



महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी सुनावणी प्रक्रियेचे कामकाज पार पाडले. यावेळी सहशहर अभियंता मनोज सेठीया, बापु गायकवाड, अनिल भालसाकळे, सहाय्यक नगररचना संचालक प्रशांत शिंपी, उपायुक्त अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, सहाय्यक आयुक्त मुकेश कोळप, विशेष अधिकारी किरण गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेने २२ ऑगस्ट २०२५ रोजी ३२ प्रभागांची प्रारूप रचना जाहीर केली होती. प्रारूप प्रभाग रचनेचे नकाशे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले होते. तसेच महापालिका भवनामध्येही हे नकाशे माहितीसाठी प्रदर्शित करण्यात आले होते. प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना देण्यासाठी गुरुवार ४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर आज प्रभागनिहाय टप्प्याटप्प्याने सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीदरम्यान हरकतदारांनी त्यांच्या हरकतीच्या अनुषंगाने अतिरिक्त स्वरूपात म्हणणे सादर केले .हरकतदाराची हरकत, त्यांनी सुनावणी दरम्यान सादर केलेले म्हणणे, शासनाचे निर्देश आणि त्या अनुषंगाने समोर येणारी वस्तुस्थिती लक्षात घेऊन प्रत्येक हरकत निर्णित करण्यात येणार आहे. तदनंतर अंतिम प्रभाग रचना शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येईल .प्रभागनिहाय सुनावणीचे जाहीर करण्यात

आले होते वेळापत्रक

प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त हरकतींच्या सुनावणीसाठी हरकतदारांना पूर्वसूचना देऊन उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने प्रभागनिहाय व हरकतीच्या क्रमांकानुसार हरकतदारांना वेळ कळवण्यात आली होती. या सुनावणीचे वेळापत्रकही जाहीर करण्यात आले होते. या वेळापत्रकानुसार दुपारी १ वाजता प्रभाग क्रमांक १, २, ११ आणि १२ वर आलेल्या हरकतींची, दुपारी २ वाजता प्रभाग क्रमांक ३, ४, ६, ७, ८, ९, १०, १४ आणि २० वर आलेल्या हरकतींची, दुपारी ३ वाजता प्रभाग क्रमांक १० आणि ११ वर आलेल्या हरकतींची आणि सायंकाळी ४ वाजता प्रभाग क्रमांक २३, २४, २५, २६, २९, ३१ आणि ३२ वर आलेल्या हरकतींची सुनावणी सुरू करण्यात आली.

# पुणे शहराचा 'स्वच्छ वायू सर्वेक्षण 2025'मध्ये देशात दहावा क्रमांक!

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या 'स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५'मध्ये पुणे देशात दहाव्या स्थानी आले आहे. दहा लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या देशभरातील मोठ्या शहरांच्या श्रेणीत पुणे शहराने हा क्रमांक मिळवला.**




गेल्या वर्षी पुणे २३ व्या क्रमांकावर होते.केंद्र सरकारच्या वतीने हे सर्वेक्षण करण्यात आले. देशपातळीवरील अनेक मोठी शहरे यामध्ये सहभागी झाली होती. या सर्वेक्षणात मध्य प्रदेशातील इंदूरने प्रथम क्रमांक पटकविला. मध्य प्रदेशातीलच जबलपूर शहराने दुसरा क्रमांक, तर उत्तर प्रदेश येथील आग्रा आणि गुजरात येथील सुरत यांनी संयुक्तपणे तिसरा क्रमांक मिळविला.या सर्वेक्षणात वायू गुणवत्ता, नागरिकांचा सहभाग, शाश्वत उपाययोजना आणि प्रशासनाची भूमिका अशा विविध निकषांवर आधारित मूल्यांकन करण्यात येते.या सर्वेक्षणात १३० हून अधिक शहरांचा समावेश होता.

हवेची गुणवत्ता, कचरा व्यवस्थापन, औद्योगिक उत्सर्जन, रस्त्यावरील धूळ नियंत्रण, सार्वजनिक जागरूकता, इलेक्ट्रिक वाहनांचा वापर आणि हरित उपक्रम अशा विविध निकषांवर शहरे तपासण्यात आली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579